# नियमित दिवाणी दावा क्र. ६/२०१७ मधील निशाणी क्र. ६८ वरील आदेश

वादींतर्फे प्रस्तुतचा निशाणी क्र. ६८ कडील अर्ज प्रतिवादी क्र. १ पिरगोंडा मलकाप्पा जाबगोंडा हा दिनांक ०५/०९/२०२१ रोजी मयत झाला असल्याने त्याचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता झालेला विलंब माफ होऊन परवानगी मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जाचे पाठीमागील बाजूस दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. २ चे कथित वारसांना पुरेशी संधी देऊनही त्यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत दाखल केले नाही. सबब, त्यांचे म्हणणेशिवाय प्रस्तुतचा अर्ज निकालासाठी विचारात घेण्यात आला.

२) वादींचे प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. २ पिरगोंडा मलकाप्पा जाबगोंड हा दि. ०५/०९/२०२१ रोजी मयत झाला आहे. त्याचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी वादींना १ वर्ष २ दिवसाचा विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र. २ मयत झालेबाबत दि. १२/१०/२०२२ रोजी मेहरबान न्यायालयास पहिल्यांदाच कळविले. त्यावेळी त्याबाबत वादींना माहिती झाली आणि त्यांनंतर त्यांनी त्याबाबत माहिती गोळा केली. कोव्हीड–१९ मुळे न्यायालयीन कामकाज बंद होते. वादी हे अशिक्षित आहेत व त्यांना कायद्याचे ज्ञान नाही. मयत प्रतिवादीचे वारस हे प्रतिवादींनीच स्वतःच अभिलेखावर आणावे लागतात अशी वादीची समजूत होती. वादीचे वडीलही मयत झाल्याने वादीची मनःस्थिती चांगली नव्हती. वादींनी मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणण्यास जाणूनबुजून विलंब केला नाही. या सर्व कारणांचा विचार करून मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळावा. सदर विलंब माफ झाल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. मात्र सदरचा विलंब माफ झाला नाही तर वादींचे कायमस्वरूपी अपरिमित व पैशाने न भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुत कामी मयत प्रतिवादीचे वारसांना रेकॉर्डवर घेण्याकामी झालेला विलंब माफ करण्यात यावा व प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती वादींतर्फे करण्यात आली आहे.

३) प्रतिवादींतर्फे असे प्रतिकथन केले आहे की, वादींनी झालेल्या विलंबाबाबत दिलेली कारणे संयुक्तिकरित्या योग्य व बरोबर नाहीत. वादी व प्रतिवादी एकाच गावातील शेजारी शेजारी राहण्यास आहेत. प्रतिवादी मयत झाल्याची वादींना पूर्ण कल्पना होती. सबब, प्रतिवादींनी कळविल्यानंतर माहिती झाले हे योग्य वाटत नाही. कोव्हीड–१९ चा प्रादुर्भाव सन २०२१ मध्ये संपलेला असताना तेच कारण देणे योग्य नाही. सबब, वादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर मे. न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास विलंबाचा कालावधी विचारात घेऊन जास्तीत जास्त खर्चाबाबतचा आदेश व्हावा.

४) अर्ज वाचला. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दावा, प्रस्तुतचा अर्ज व सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) दावा हा वाटपाकरिता दाखल करण्यात आला आहे. स्थावर मिळकतीतील पक्षकारांचे हक्क व हितसंबंध या अनुषंगाने सदरचा दावा आहे. अर्जाचे पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. निशाणी क्र. ६७ सोबत अ. क्र. १ कडील दाखल मृत्युप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. २ पिरगोंडा मलकाप्पा जाबगोंड हा दिनांक ०५/०९/२०२१ रोजी मयत झाला असल्याची बाब स्पष्ट होते. तसेच वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेल्या विलंबाकरिता प्रतिवादींनी माहिती मिळविण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत जी कारणे नमूद केली आहेत ती सारासार विवेकबुद्धीने विचारात घेण्यासारखी आहेत. तथापि, त्यांनी कोव्हीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे विलंब झाल्याचे जे कारण नमूद केले आहे ते कारण हे प्रतिवादी क्र. १ मयत झाल्याबाबत इतर प्रतिवादींनी दि. १२/१०/२०२२ रोजी न्यायालयास त्याबाबत कळविले असल्यामुळे व त्यावेळी कोवहीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे लावलेला टाळेबंदीचा कालावधी संपला असल्यामुळे समर्थनीय नाही. परंतु केवळ तेवढ्याच कारणामुळे वादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादींना प्रतिवादी क्र .१ चे वारसांविरोधात प्रस्तुतचा दावा चालविण्याचा जो अधिकार आहे त्यास मुकावे लागेल. त्याचबरोबर दावा स्थावर मिळकतीतील पक्षकारांचे हक्कांबाबतचा

असल्याने तो वादीला मयत प्रतिवादीचे वारसांविरोधात पुढे चालविण्याचा हक्क आहे. त्याचबरोबर उभय पक्षकारांमधील वादाचे गुणदोषावर निराकरण करण्यासाठी, वाद विषयांची अनेकता टाळण्यासाठी तसेच प्रकरणातील गुंतागुंत टाळण्यासाठी वारस अभिलेखावर आणण्याकरिता झालेला विलंब माफ करणे न्यायाचे व गरजेचे आहे. तथापि, त्याचवेळी वादींकडून वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेल्या विलंबाचा सारासार विचार केला असता वादींकडून प्रस्तुत प्रतिवादींना खर्चापोटी एकूण रक्कम रू. २००/– देण्याचे आदेशीत केल्यास या प्रकरणात न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून माझे असे मत आहे की, वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. ६८ वादींनी प्रस्तुत प्रतिवादींना एकूण खर्चाची रक्कम रू. २००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहेत.

२. वर नमूद केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर मयत प्रतिवादी क्र. २ चे वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा.

स्वाक्षरीत/–
(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

स्थळ : जत
दिनांक : १४/०२/२०२४

## <u>प्रमाणपत्र</u>

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी-III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | १४/०२/२०२४ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | १४/०२/२०२४ |
| आदेश अपलोड केलेली तारीख | २०/०२/२०२४ |